**क्रमांक : १३९**

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग-दोन

**गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ / अग्रहायण ३, १९४४ (शके)**

**संदर्भ : १) या सचिवालयाचे पत्रक भाग-२ क्रमांक ३६, दिनांकित ५ मार्च, २०२०.**
**२) या सचिवालयाचे पत्रक भाग-२ क्रमांक १०८, दिनांकित १७ ऑगस्ट, २०२२**

**१३९ .** सन २०२२ च्या चतुर्थ (हिवाळी) अधिवेशनापासून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार औचित्याचा मुद्दा **PROIS** या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (**online**) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. औचित्याच्या मुद्दयाबाबतची बाब दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आली असेल त्याच दिवशी मा. सदस्यांना जो औचित्याव्दारे मुद्दा उपस्थित करावयाचा असेल तोच मुद्दा त्यांनी **PROIS या संगणक प्रणालीव्दारे संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने सकाळी ०७.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत या सचिवालयाकडे पाठविण्यात यावा. ऑफलाईन (Offline) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.** सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या मुद्द्यांपैकी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी मान्य केलेल्या मुद्दयांचे सकाळी १०.३० वाजता तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशानुसार बॅलट काढण्यात येईल व एका वेळी एकूण २५ मुद्दे सदस्य निहाय घेण्यात येतील.

बॅलटमध्ये आलेल्या २५ औचित्याच्या मुद्दयांची सूची प्रधान सचिव यांच्या दालनात तसेच जेथे सन्माननीय सदस्यांचा उपस्थिती पट ठेवण्यात येतो तेथे ठेवण्यात येईल. बॅलटमध्ये आलेल्या सन्माननीय सदस्यांनी त्याच दिवशी औचित्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित न केल्यास तो मुद्दा व्यपगत समजण्यात येईल व त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

**विधान भवन**,
मुंबई,
दिनांक : **२४ नोव्हेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
८) संगणक कक्ष (WEBSITE)
९) एम.के.सी.एल. **(MKCL)**

C:\Users\८६३६४१०४५५०२\Desktop\New Microsoft Word Document.docx